महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ❖ १५ जून २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक ३४७ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024





# एसटी महामंडळात आता कर्नाटक पॅटर्न!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार सुनियोजन व निर्णयाचे विकेंद्रीकरण करण्याच्या हेतूने कर्नाटक परिवहन महामंडळ धर्तीवर एसटी महामंडळातंर्गत ५ प्रादेशिक विभागांची निर्मिती करण्यात आली आहे.

त्याची अंमलबजावणी करण्याचे परिपत्रक नुकतेच एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी काढले आहे. त्यानुसार पुढील काही दिवसात हे प्रादेशिक विभाग स्वतंत्रपणे आपले कार्यालय सुरू करीत आहेत. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या म्हणजे एसटी महामंडळाच्या नियोजन व पणन खाते




अंतर्गत कार्यरत असलेल्या विविध संनियंत्रण समित्यांचे कार्यालय ०६ डिसेंबर २०१६ पासून बंद करण्यात आले होते.

परंतु परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक हे कर्नाटक राज्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी तेथील महामंडळाच्या

## ५ प्रादेशिक विभागांची निर्मिती

विकेंद्रीकरणाची संकल्पना उचलून धरली. त्यामुळे आकार व प्रशासकीय दृष्ट्या कर्नाटक महामंडळाच्या दुप्पट असणाऱ्या महाराष्ट्र एसटी महामंडळाचे देखील किमान ५ प्रादेशिक विभागात विभाजन करावे अशी संकल्पना त्यांनी मांडली. राज्य शासनाच्या महसूल विभागाच्या धर्तीवर एसटीची यंत्रणा उभी आहे. तालुकास्तरावर आगार जिल्हास्तरावर विभागीय कार्यालय आणि राज्य स्तरावर मध्यवर्ती कार्यालय अशी त्रिस्तरीय रचना सध्या कार्यरत आहे. परंतु राज्य शासनाच्या महसूल विभागाप्रमाणे सहा प्रशासकीय विभागांचा या त्रिस्तरीय रचनेत समावेश नव्हता. त्यामुळे मध्यवर्ती कार्यातून थेट विभागीय कार्यालयाशी संवाद साधणे भौगोलिक दृष्ट्या शक्य होत नव्हते. असे असणार ५ प्रादेशिक विभाग मुंबई, नाशिक, नागपूर, पुणे व अमरावती असे ५ प्रादेशिक विभाग करण्यात आले असून, प्रत्येक प्रादेशिक विभाग अंतर्गत कार्यरत विभाग व मुख्यालय निश्चित करण्यात आले आहेत. प्रत्येक समितीसाठी आवश्यक तेवढ्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून, त्या-त्या भागातील प्रवाशांना अधिक सुरक्षित, सोयीस्कर आणि वेळेत सेवा मिळण्यासाठी सर्व प्रकारचे नियोजन राबवले जाणार आहे. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना योग्य ती अंमलबजावणी तातडीने सुरु करण्याचे निर्देश दिले आहेत. स्थानिक पातळीवर वाहतुकीचे नियोजन करणे, यात्रा-जत्रा यासाठी जादा वाहतूक करणे असे निर्णय घेण्यासाठी विलंब होत असे, अथवा प्रशासकीय दिरंगाईमुळे त्याचा विपरीत परिणाम एसटीच्या महसूलावर होत होता. या सर्वांची दखल घेऊन " नियंत्रण नियोजन आणि समन्वयाच्या " हेतूने महामंळातंर्गत ५ प्रादेशिक विभाग करण्याचा निर्णय घेतला आहे. असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.




# अंबरनाथमध्ये रेशनिंग कार्यालयाची दुरवस्था



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : अंबरनाथमधील धोकादायक आणि जुनाट जागेतील रेशनिंग कार्यालयाची दुरवस्था झाली आहे. दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाल्याने लोकवर्गणीतून रेशनिंग कार्यालय बांधण्याची परवानगी देण्याची मागणी शिवसेनेने अंबरनाथ तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी (ता. १३) तहसीलदार कार्यालयात नायब तहसीलदार दीपक अनारे यांच्याकडे त्या संदर्भात निवेदन दिले आहे. कल्याण-बदलापूर महामार्गावरील रेशनिंग कार्यालयात अनेक वर्षांपासून अनेक गैरसोई आहेत. शहरातील इतर शासकीय कार्यालये वातानुकूलित आणि संगणिकृत सुसज्ज झाली आहेत. रेशनिंगच्या कामानिमित्त कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना उभे राहण्यासाठी पुरेशी जागा नाही. कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनाही गैरसोईचा सामना करत काम करावे लागते. पावसाळयात पावसाचे पाणी कार्यालयात शिरते. जुने अहवाल ठेवायला योग्य जागा नाही, अशा गैरसोई असताना रेशनिंग कार्यालयाच्या दुरुस्तीकडे अथवा नूतनीकरण करण्याकडे दुर्लक्ष झाल्याबद्दल शिवसेना पदाधिकाऱ्यांनी संताप व्यक्त केला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त २७ जुलैला रेशनिंग कार्यालय लोकवर्गणीतून बांधण्याचे ठरवले आहे. त्याबाबत शासकीय नियमावली आणि इतर मार्गदर्शक सूचना येत्या १५ दिवसांत लेखी स्वरूपात देण्याची मागणी तहसीलदारांकडे दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. याप्रसंगी शिवसेना ठाकरे गटाचे शहर संघटक रमेश डोंगरे, शहरप्रमुख ॲड. संदीप पगारे आणि अजित काळे; तसेच महिंद्र कांबळे, संतोष शिंदे, हेमंत घुमाने, यश गायकवाड आदींनी नायब तहसीलदार दीपक अनारे यांची भेट घेऊन रेशनिंग कार्यालय लोकवर्गणीतून बांधण्याची परवानगी देण्याबाबतचे निवेदन दिले.

# बदलापूर नगरपालिका निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी सुरु

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : येत्या तीन ते चार महिन्यात बदलापूर नगरपालिकेची निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. कारण बदलापूर नगरपालिकेच्या प्रभाग रचनेसंदर्भातील आदेश नगरपालिकेला प्राप्त झाले आहेत. त्यामुळे विद्यमान नगरसेवकांसह इच्छुकांची धाकधूक वाढली आहे. आपला प्रभाग राहणार की नवा प्रभाग शोधावा लागणार याचे टेन्शन असले तरी २०२२ चीच प्रभाग रचना कायम राहण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच सर्व नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर निवडणूक




आयोग तयारीला लागले. त्यानुसार बदलापूर नगरपालिकेला नवीन प्रभाग रचने संदर्भातील आदेश प्राप्त झाले आहेत. बदलापूर नगरपालिकेत २०२२ च्या प्रभाग रचनेनुसार सध्या ४९ प्रभाग आहेत. यापूर्वी ४७ प्रभाग होते त्यात दोन प्रभागांची वाढ झाली आहे.

आता पुन्हा नव्याने प्रभागरचनेसंदर्भातील आदेश प्राप्त झाल्यामुळे आपला प्रभाग बदलणार की तोच राहणार यावरून राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. मात्र असे असले तरी सुद्धा २०२२ला घोषित झालेली प्रभाग रचना निवडणुकीसाठी लागू होईल ही शक्यता जास्त आहे.

### कार्यकर्त्यांमध्ये हुरूप


कोरोनाच्या पूर्वीच बदलापूर नगरपालिकेची मुदत संपली होती. एप्रिल २०२० पासून बदलापूर नगरपालिकेत प्रशासकीय राजवट असून लवकरात लवकर निवडणुका व्हाव्यात अशी सर्वपक्षीय स्थानिक कार्यकर्त्यांच्या आणि आजी-माजी नगरसेवकांची इच्छा आहे. त्यामुळे आता सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर तरी निवडणुका लवकरात लवकर होणार का, हेच पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यातच आता प्रभाग रचनेचे आदेश आल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये हुरूप वाढला आहे.

# भिवंडीत डाईंग कंपनीला आग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी तालुक्यातील शेलार ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील मीठ पाडा या भागात असलेल्या कच्च्या कापडावर रंगाची प्रक्रिया करणाऱ्या डाईंग कंपनीला आज रात्री 9 वा.सुमारास भीषण आग लागली. आगीचे लोट आकाशात पसरल्याने काळाकुट्ट धुर सर्व भागात पसरला आगीत केमिकल सुध्दा जळाल्याने दुर्गंधी पसरली होती.त्यामुळे परिसरात राहणाऱ्या नागरिकांमध्ये मोठी खळबळ उडाली होती.घटनेची माहिती नागरिकांनी पोलीस व भिवंडी महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

भिवंडी शहर परिसरात गेल्या काही महिन्यांपासून आग लागण्याचे गंभीर



प्रकार घडत आहेत, आज रात्री 9 वा.सुमारास भिवंडी - वाडा मार्गावरील शेलार ग्रामपंचायत हद्दीतील मीठ पाडा परिसरात कच्च्या कापडावर रंगाची प्रक्रिया करणारी खेमीसती नामक डाईंग कंपनी असून या कंपनीच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर कच्च्या कपड्यांची मोठ्या प्रमाणात साठवणूक केली होती रात्री अचानकपणे या कपड्यांचा गठाणीला आग लागली त्यामुळे कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची धावपळ उडाली आणि आग विझविण्यासाठी प्रयत्न सुरू करीत त्यांनी आगीची माहिती पोलीस व भिवंडी महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांना कळवतात जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

मात्र कपड्याच्या कच्च्या मालामुळे या आगीने रौद्ररूप धारण केले होते. आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवानांन परिश्रम करावे लागत आहे. घटनास्थळी पाण्याचे टँकर मागविण्यात आले असून आग आटोक्यात आणण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत रात्री उशिरा ही आटोक्यात आणून जवानांनी आग शांत केली आहे.याआगीत कापड व मालमत्ता जळून खाक झाली आहे. ही आग कशामुळे लागली याबाबत अद्याप कोणतीही माहिती मिळाली नसल्याची माहिती अग्निशमन दलाच्या जवानांनी दिली.पोलिसांनी या आगी संदर्भात नोंद घेऊन चौकशी सुरू केली आहे.

# 'रिंग रेल्वे मेट्रो' प्रकल्पाला मिळणार गती



## कामाची निविदा मंजुरी अंतिम टप्प्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणेकरांचा प्रवास सुखकर व्हावा, त्यांच्या वेळेची बचत व्हावी, यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रयत्नांनी 'ठाणे अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रो'च्या (वर्तुळाकार मेट्रो) कामाला केंद्र आणि राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. मेट्रो प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण व्हावा, यासाठी ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र सरकारकडे पाठपुरावा करीत आहेत. मेट्रो प्रकल्पाच्या कामाला गती देण्यासाठी मेट्रो प्रकल्पाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत खासदार नरेश म्हस्के यांनी बैठक घेतली. बैठकीत २०२९ पर्यंत 'ठाणे अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रो' प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली आहे. Adobe ठाणे शहराचा वाढता विस्तार लक्षात घेत ठाणेकरांची वाहतूक कोंडीतून सुटका व्हावी, यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रोच्या कामाची मुहूर्तमेढ रोवली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या प्रकल्पाला तत्काळ मंजुरी देऊन भरीव निधी मंजूर केला. नुकत्याच दिल्लीत झालेल्या नगरविकास आणि गृहनिर्माणविषयक स्थायी समितीच्या बैठकीत नरेश म्हस्के यांनी कामाला गती मिळावी, यासाठी मुद्दा उपस्थित केला होता. तसेच शनिवारी (ता. १४) नरेश म्हस्के यांनी ठाणे अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रो प्रकल्पाचे प्रकल्प संचालक राजीव त्यागी, मुख्य प्रकल्प अधिकारी सुनीलकुमार गर्ग, व्यवस्थापक प्रवीण पापोळकर यांच्यासमवेत कामाच्या प्रगतीबाबत आढावा बैठक घेतली व प्रकल्पाबाबत सविस्तर चर्चा केली. १२ हजार २०० कोटींची मंजुरी असलेल्या हा अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रो प्रकल्प २९ कि.मी. लांबीचा आहे. २६ कि.मी. जमिनीवरून तर तीन कि.मी. जमिनीखालून (भूमिगत) ही रेल्वे धावणार आहे. याच्या मार्गिका अंतिम करण्यात आल्या आहेत. २२ स्थानके उन्नत तर दोन स्थानके भूमिगत असणार आहेत. भूमिगत असलेली स्थानके ही जुने ठाणे रेल्वेस्थानक आणि नवीन ठाणे रेल्वेस्थानक यांना जोडणारी असणार आहे. भूमिगत रेल्वे प्रकल्पाबाबत नागरिकांमध्ये काही गैरसमज निर्माण झाले होते. भूमिगत रेल्वेमुळे कोणत्याही इमारती अथवा बांधकामांस बाधा किंवा अडचण निर्माण होणार नसल्याचे बैठकीत स्पष्ट केले. पहिल्या टप्प्यातील रायलादेवी ते बाळकूम नाका या २० किलोमीटर लांबीच्या कामासाठी १,४०० रुपये कोटी रुपयांची निविदा मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आली आहे, अशी माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली आहे.










## गीतासार



### अध्याय १३
### क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगः

समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम् । विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति ॥ १३-२७ ॥

जो पुरुष नाशिवंत सर्व चराचर भूतांत परमेश्वर हा अविनाशी व सर्वत्र समभावाने स्थित असलेला पाहतो, तोच खरे पाहतो. ॥ १३-२७ ॥

समं पश्यन्हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् । न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ॥ १३-२८ ॥

कारण जो पुरुष सर्वांमध्ये समरूपाने असलेल्या परमेश्वराला समान पाहून आपणच आपला नाश करून घेत नाही, त्यामुळे तो परम गतीला जातो. ॥ १३-२८ ॥

प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः । यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति ॥ १३-२९ ॥

आणि जो पुरुष सर्व कर्मे सर्व प्रकारे प्रकृतीकडून केली जाणारी आहेत, असे पाहतो आणि आत्मा अकर्ता आहे, असे पाहतो, तोच खरा पाहतो. ॥ १३-२९ ॥

यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति । तत एव च विस्तारं ब्रह्म सम्पद्यते तदा ॥ १३-३० ॥

ज्या क्षणी हा पुरुष भूतांचे निरनिराळे भाव एका परमात्म्यातच असलेले आणि त्या परमात्म्यापासूनच सर्व भूतांचा विस्तार आहे, असे पाहतो, त्याच क्षणी तो सच्चिदानंदघन ब्रह्माला प्राप्त होतो. ॥ १३-३० ॥

# शिवलिंग एक अप्रतिम कलाकृती




**शब्दांकन**
**- गिरीधर पिंगळे गुरुजी**
**गोरठण बुद्रुक खालापूर**
**मो : ९८२३७७९६०६**

जग ही एक रंगभूमी आहे असे म्हटले तर वावगं ठरणार नाही आपण सर्व या रंगभूमीची पात्रे आहोत तरीही आपण करमणुकीसाठी इतर साधनांचा वापर करतो पूर्वीच्या काळी सिनेमा नाटक व आकाशवाणी एवढीच करमणुकीची साधने होती आपण आपली करमणूक करूनच घेत होतो त्यामुळे आपल्या जीवनातील थोडा वेळ करमणुकीसाठी वापर करीत होतो परंतु आधुनिक काळात नाटक सिनेमा सोबत टीव्ही व्हिडिओ मोबाईल मध्ये असे असंख्य कार्यक्रम प्रसारित होत आहेत त्यासाठी आपला जादा वेळ करमणुकीत जात आहे.

माणसाचा विचार केला तर टीव्ही मोबाईल मध्ये माणूस त्याच्या आकारापेक्षा लहान असतो मात्र सिनेमाच्या पडद्यावर तो जीवमात्राची प्रतिमा मोठी असते. नाटक हे एकच करमणुकीचे साधन आहे त्यामध्ये माणूस व प्राणी सजीव असतो त्यामुळे तो आपल्याला जास्त भावतो. नाटकातील भावभावना मनाला भिडतात किंचित प्रसंगी हास्याचा कल्लोल होतो तरी काही प्रसंगी डोळ्यातून अश्रूधारा वाहतात. नटसम्राट नाटक पाहिले असेल तर याचे प्रत्यंतर येते.

पूर्वीच्या काळी प्रत्येक तालुक्यातील गावागावात नाटके बसवण्याची परंपरा होती शेतीची कामे उरकल्यावर ग्रामीण भागातील माणसे पोथी पुराणाचे वाचन करीत तरुण वर्ग नाटक सादर करण्यात रंगून जात परंतु आता नाटकाची परंपरा खंडित होते की काय याची काळजी वाटते.

आपण उरण तालुक्यापुरते सांगायचे झाल्यास भेंडखळ गावात शिक्षक असताना मोरा येथे अश्रूंची झाली फुले हे, तो मी नव्हेच, कच देवयानी, वाहतो ही दुर्वांची जुडी हे नाटक पाहिले .कोप्रोली, उरण, आवरे, गोवठणे, पाणदिवे, वशेणी जसखार,नवघर, सोनारी, बोकडवीरा फुंडे येथे ही नाटके होत. परंतु आता काळ बदलला लोक शेती ऐवजी नोकरी व्यवसाय करू लागले कामे जास्त व वेळ कमी अशी अवस्था झाली त्यामुळे नाटकासाठी वेळ मिळेनासा झाला. पण आता परिस्थितीतही जय हनुमान मंडळ गोवठणे उरण यांनी नाटकाची परंपरा जपली.

८ जून २०२५ रोजी या मंडळींनी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे लेखक शारदा कुमार शिर्सेकर लिखित शिवअलिंगन हे छत्रपती शिवरायांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक नाटक सादर केले जणू एक क्रांतिकारक व एक युगपुरुष एकत्र आल्याचा भास झाला. नाटक वेळेवर सकाळी 11 वाजता सुरू झाले. नाटकातील संगीत नांदीने सर्व प्रेक्षक वर्गाला भारावून टाकले.

नाटकाचे नेपथ्य इतके हुबेहुब होते की एखाद्या व्यावसायिक नाटकात जेवढी कालाकारीता असते त्याहून जादा उत्तम उत्तमोत्तम शीन ही होती. एक जबरदस्त नाटक पाहत आहोत असा भास झाला. नाटकातील पात्रांचा आवाज खणखणीत होता.त्यामुळे आपण त्यावेळच्या ऐतिहासिक वातावरणाशी एकरूप झालो पात्रांची भाषाशैली पात्रासाठी शोभेशी होती पात्रांच्या शब्दफेकीत आमच्या मनात आवेश निर्माण झाला. शिवरायांशी गद्दारी करणारा बद्दल कीव आली. एक प्रकारची चीड निर्माण झाली. शिवराय व जिजाऊमाता यांचे संवाद तर मनात घर करून राहिले नेताजी पालकर यांची मर्दुमकी भाषा मनाला भावली. व टाळ्यांचा कडकडाट करून गेली. बहिर्जींची भूमिका बरेच काही सांगून गेली. पंताजी व कृष्णाजी भास्कर यांच्या शिष्टाईने तर कमाल केली चपळक संवादाने सर्व प्रेक्षकांना भारावून टाकले. अफजल खानाची भूमिका ही तेवढ्याच ताकदीने वठली गेली. शिवबाची शब्दफेक ही अगदी धारदार होती. त्यामुळे प्रेक्षकांनी घोषणांचा आस्वाद घेतला.

नाटकाचे दिग्दर्शन पांडुरंग पाटील यांनी दर्जेदार केले आहे नाटकातील केशभूषा व वेशभूषा पात्रांना साजेशी होती. नाटकाचे संगीत व पार्श्वसंगीत खूप मनोवेधक व प्रसंगांना साजेसे होते. कोणत्याही व्यावसायिक नाटका इतके प्रभावी होते. हीच नाटकाची वास्तवता आहे. सर्वच पात्रांची कामे सुरेख झाली आहेत .

नाटकातील पात्रे व त्या भूमिका करणारे कलावंत म्हणजे जिजाऊमाता हेमांगी म्हात्रे शिवराय नरेंद्र वर्तक अफजल खान कृष्णकांत म्हात्रे नेताजी शैलेंद्र म्हात्रे सय्यदबंडा निलेश म्हात्रे पंताजी अशोक म्हात्रे कृष्णाजी भास्कर प्रेम पाटील कान्होजी जगन्नाथ वर्तक खवासखान रूपम म्हात्रे बहिर्जी आकाश पाटील बाजी रोहन म्हात्रे भवान्या विवेक वर्तक प्रतापराव महेश पाटील जीवा अतिष वर्तक संभाजी कावजी प्रदीप वर्तक बिजली सौ शीतल म्हात्रे तसेच सहकालाकार संदीप म्हात्रे साई म्हात्रे क्रिश म्हात्रे सुरेश वर्तक या सर्व कलाकारांनी आपापल्या भूमिका अतिशय मन लावून साकारलेल्या आहेत प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे नाटक पाहिले. नाटक पाहून झाल्यावर नाट्यगृहाबाहेर आल्यावर प्रेक्षक फारच खुश दिसत होते. नाटक अतिशय चांगले झाले नाटकाबद्दल प्रतिक्रिया देताना कांदिवली येथील लेक्सी फर्नांडिस मुंबईचे रमेश मते भांडुपचे दिवाकर पिंगळे यांनी तोंड भरून कौतुक केले. कलाकारांनी नाटकासाठी केले त्या कष्टाचे चीज झाले आहे असे मला वाटते. कलाकार हा जन्मजात नट नसतो तर त्याचे वर टीकेचे घाव सोसल्यावर एवढा मोठा नट याच कलाकारातून निर्माण होणार आहे याची मला खात्री आहे असे.

हे नाटक प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे नाटकहोते. प्रत्येक संस्थेने संस्था वाढीसाठी या नाटकाच्या प्रयोगाची योजना करावी तसेच एखाद्या मोठ्या समारंभासाठी आपण या नाटकाच्या प्रयोगाला प्राधान्य द्यावे असे मला वाटते आमचे हे गोवठणे उरणचे नाट्य कलावंत मनोमन म्हणत असतील सेवेची तत्पर आम्ही गोवठणेकर. आमच्या या ग्रामीण भागातील हौशी कलाकारांना आपली सेवा करण्याची संधी मिळाली असे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

जय जिजाऊ जय शिवाजी!

# भारतीय युवकाने घडवला परकीय भूमीवर इतिहास...



**तब्बल तीस तास धावला**

कुणाल.....कुणाल विजयकुमार पाटील असे या जिद्दी तरुणाचे नाव आहे.नुकतीच इटली मधे डोलोमाईट एक्स्टरीम ट्रेल रन ही जगातील धावपटूंसाठी प्रतिष्ठेची मानली जाणारी स्पर्धा पार पडली.ही स्पर्धा इटलीमधील जगप्रसिद्ध डोलोमाईट डोंगररांगांतून धावण्याची असते.अंतर असते १०३ किलोमीटर,ही स्पर्धा केवळ धावण्याची नसून, डोंगर रांगांतून चढ उतार करत हे अंतर पूर्ण करण्याची होती, अत्यंत कठीण डोंगर पायवाटा, नद्या,नाले,ओढे, जंगले पार करत धावण्याची ही स्पर्धा होती.काही ठिकाणी उतार एव्हढे तीव्र होते की आयोजकांनी खडकांना केबल बांधल्या होत्या त्या पकडून काळजीपूर्वक खाली उतरावे लागते,पाय घसरला की संपले सगळे.चढण इतकी तीव्र की हिमालयीन पर्वतांसारखी चढ (एलेव्हेशन ७१००)इतका असतो. काही ठिकाणी तर चढण्यासाठी शिड्या लावल्या होत्या. स्पर्धकांच्या शारिरीक क्षमतेची कसोटी लागण्यार्या स्पर्धेत धावत होता एकमेव भारतीय तरुण 'कुणाल'.स्पर्धा रात्री दहा वाजता म्हणजे भारतीय वेळ रात्री दिड वाजता सुरु झाली.बंदुकीचा बार होताच,सत्तर देशांतून आलेल्या स्पर्धकांनी धावायला सुरुवात केली.काही वेळ सर्व सुरळीत चालले,पण कुणालचे दुर्दैव आडवे आले. पंचवीस किलोमीटर धावल्यावर कुणालचा बूट फाटला व सोल वेगळा झाला. प्रचंड वेगाने वाहणारे वारे, अत्यंत थंड तापमान, डोंगर उतारांचा खाच खळग्यांचा,दगडगोट्यांचा मार्ग, अनवाणी धावणं शक्यच नव्हते.या बहादुर युवकाने, त्यांना जखम झाली तर बांधण्यासाठी दिलेले बॅण्डेज काढले व आपला फाटलेला बूट तळव्यासह बांधला, परंतू तो फार काळ टिकत नसे, पुन्हा पुन्हा थांबून तो बांधावा लागत असे, असे करत त्याने पंचावन्न किलोमीटरचा टप्पा गाठला.तेथे तो आयोजकांनी ठेवलेल्या मदत केंद्रात गेला, बूट वापरण्यासारखा राहिला नव्हता.तेथील स्वयंसेवकांनी त्याला धीर देऊन व धावपळ करून बूट उपलब्ध करून दिले. आता साइज जमेना नवी समस्या. तरी ते बूट घालून तो परत धावू लागला.परंतू बूट नवे असल्याने व साइजचे नसल्याने बूट पायाला घासू लागले व त्यामूळे ब्लिस्टर म्हणजे पाणीदार फोड येऊन लागले,पुन्हा एकदा नवी समस्या, आता स्पर्धा सोडून द्यावी असे कुणालला वाटू लागले, तोच त्याच्या पाठीमागून येणाऱ्या इटलीच्या वयस्कर अनुभवी स्पर्धकाने त्याची परिस्थिती अचूक ओळखली, त्याने कुणालला धीर दिला,मी तुझ्या सोबत असेन स्पर्धा सोडू नको, कुणालने पुन्हा हिंमत करून पुढे जाण्याचा निर्णय घेतला. अखेर तब्बल तीस तास धावल्यानंतर अखेरचे ठिकाण आले व टाळ्यांच्या गजरात पदक गळ्यात पडले.तो पर्यंत इटलीमधील नागरिक त्यांचे स्वागत करण्यासाठी जमा झाले होते. एकमेव भारतीय ही स्पर्धा धावतो आहे हे समजल्यावर इटलीमधील भारतीय समुदाय मोठ्या उत्साहाने जमा झाला होता. त्या सर्वांनी कुणालवर पुष्पगुच्छ, भेटवस्तू व शुभेच्छांचा वर्षाव केला.सहभागी झालेल्या सर्व देशांचे ध्वज तेथे फडकावले जातात. आपला तिरंगाही तेथे दिमाखात फडकत होता.ही स्पर्धा पूर्ण करणारा तो पहिला भारतीय ठरला आहे.

कुणाल विजयकुमार पाटील हा पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील रहिवासी आहे. भिवंडी वाडा रस्त्यावर असलेले नेहरोली हे त्याचे गाव आहे.

आजपर्यंत त्याने अनेक जागतिक ख्यातीच्या स्पर्धांमध्ये धावून पदके मिळवली आहेत. त्या अशा आहेत.
१.युन्फ्रा मॅरेथॉन स्वित्झर्लंड.
२. अथेन्स मॅरेथॉन ग्रीस (ही मूळ मॅरेथॉन आहे.)
3. बर्लिन मॅरेथॉन जर्मनी.
पर्वत रांगांमधून धावण्याची स्पर्धा (ट्रेल)
१.ज्युलियन आल्प्स अल्ट्रा ट्रेल, स्लोव्हेनिया ८० किलोमीटर, एलेव्हेशन ३६००.
२.पिनानी अल्ट्रा ट्रेल पोलंड ६५ किलोमीटर, एलेव्हेशन ३२००.
३.डोलोमाईट एक्स्ट्रिम ट्रेल रन, १०३ किलोमीटर, एलेव्हेशन ७१००.

मूळचा सायकलपटू असणाऱ्या बहाद्दराने मुंबई मधील ख्यातनाम इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मधून उच्च प्राविण्यासह केमिकल इंजिनियरिंगची पदवी प्राप्त केली आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा भिवंडी तालुक्यात विकास योजनांचा आढावा व भेटी दौरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /ठाणे : जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी दि. १२ जून, २०२५ रोजी भिवंडी तालुक्यातील विविध गावांना भेट देऊन विकास योजनांची अंमलबजावणी, अडचणी व गरजा यांचा प्रत्यक्ष आढावा घेतला.

प्राथमिक आरोग्य कोन (ता. भिवंडी) येथील आरोग्य केंद्राच्या इमारतीची पाहणी करण्यात आली. सद्यस्थितीत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन पर्यायी जागेची पाहणीही करण्यात आली. नवीन आरोग्य केंद्र उभारण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तत्काळ सादर करण्याच्या सूचना त्यांनी आरोग्य व ग्रामपंचायत विभागाला दिल्या. दरम्यानच्या कालावधी मध्ये पर्यायी इमारतीची पाहणी केली व अनुषंगिक सुचना केल्या.

या भेटीदरम्यान गोवे व ओवळी या ग्रामपंचायतींमध्ये प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा दोन अंतर्गत “आवास प्लस सर्वेक्षण” शून्य नोंद असलेल्या गावांचा समावेश असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी या गावांना भेट देऊन ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. योजनेबाबत सविस्तर माहिती घेतली आणि लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात यावी, याबाबत स्पष्ट सूचना दिल्या. भिवंडी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी अशाच पद्धतीने प्रत्यक्ष भेटी देऊन पुनश्च खात्री करावी आणि अहवाल तालुका स्तरावर सादर करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी यावेळी स्पष्ट निर्देश दिले की, लाभार्थ्यांना योजनेत समाविष्ट होण्याची ही शेवटची संधी आहे. कोणताही पात्र लाभार्थी सर्वेक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी ग्रामस्थ, सरपंच, उपसरपंच व ग्रामविकास अधिकारी यांनी एकत्रितपणे गावात लाभार्थी शिल्लक नाही याची खात्री करून घ्यावी. लाभार्थी आढळल्यास त्यांची नोंद पुढील दोन दिवसांत तात्काळ करण्यात यावी.

खोणी, काटई व खांबे या गावांना भेट देऊन थकीत पाणीपट्टी संदर्भात बैठक घेण्यात आली. यावेळी फ्लो मीटर आणि वॉटर मीटरची पाहणी करण्यात आली. सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ व स्टेम अधिकाऱ्यांच्या समवेत चर्चा करून थकीत पाणीपट्टीची वसुली तातडीने करण्यात यावी, अशा सूचना दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या या दौऱ्यामुळे ग्रामस्तरावर योजनांच्या अंमलबजावणीला गती मिळणार असून, थेटसंवादातून नागरिकांच्या अडचणी वेळेत सोडविण्यासाठी मदत होणार आहे.

## आरोग्य

### आरोग्यवर्धक सवयी

**1. .तांब्याच्या लोट्यातील पाणी पिणे**
तांब्याचं पाणी अनेक वर्षांपासून आयुर्वेदात गुणकारी मानलं गेलं आहे. रात्री झोपण्यापूर्वी तांब्याच्या लोट्यात ठेवलेलं पाणी सकाळी उपाशीपोटी प्यायल्याने शरीरातील विषारी द्रव्यं बाहेर टाकली जातात. हे नैसर्गिक डिटॉक्सिफिकेशन शरीरासाठी खूप उपयुक्त ठरतं. यामुळे त्वचेचा नूर वाढतो, पचनक्रिया सुधारते आणि लठ्ठपणा कमी होतो.

**2. ब्रश करण्याआधी हे करा**
ब्रश करण्याआधी तीळ किंवा खोबरेल तेल तोंडात घेऊन ५-१० मिनिटं तोंडात फिर्वणं म्हणजेच तेल पुलिंग. ही पद्धत तोंडातील जंतूंना नष्ट करतं, हिरड्यांचं आरोग्य सुधारते आणि संपूर्ण तोंडाच्या स्वच्छतेसाठी फायदेशीर ठरते. हा उपाय पायरिया, दुर्गंधी आणि दातांच्या सडण्यापासून वाचवतो.

**3. सूर्यनमस्कार किंवा हलकी व्यायाम**
सकाळी केलेला व्यायाम संपूर्ण दिवसासाठी ऊर्जा प्रदान करतो. योगासने, प्राणायाम किंवा फक्त १० सूर्यनमस्कारही शरीराला ताजेतवाने ठेवतात. यामुळे रक्ताभिसरण सुधारतं, हृदय बळकट राहतं आणि मेंदूला ऑक्सिजनचा योग्य पुरवठा होतो. व्यायामामुळे मानसिक तणावही कमी होतो.

**4. कोमट पाणी पिणे**
कोमट पाणी पिऊन दिवसाची सुरुवात केल्यास पचनसंस्था उत्तम राहते. विशेषतः लिंबू आणि मधासोबत कोमट पाणी घेतल्यास शरीरातील चरबी वितळते आणि शरीर हलकं वाटतं. यामुळे बद्धकोष्ठतेसारख्या समस्याही कमी होतात.

**या सवयींचे फायदे**
वरील सवयींचा अवलंब केल्यास शरीराला फक्त बाह्य नव्हे तर अंतर्गत स्तरावरही फायदे होतात. रोगप्रतिकारक शक्ती वाढते, त्वचेची चमक टिकून राहते, थकवा जाणवत नाही आणि मन प्रसन्न राहतं. हृदयरोग, मधुमेह, उच्च रक्तदाब अशा अनेक आजारांपासून संरक्षण मिळतं.

# मुंबईतील महिला पोलीस कर्मचाऱ्यांची ‘ब्रेस्ट कॅन्सर तपासणी’



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /मुंबई : हास्यजत्रा फेम विनोदी कलाकार , अभिनेते अरुण कदम यांच्या संकल्पनेतून मुंबई पोलीस दलातील महिला पोलिसांचे आरोग्य सुदृढ रहावे, त्यांना निरोगी आणि आनंददायी जीवन जगता यावे आणि मुंबईकरांप्रति आपले कर्तव्य बजावता यावे या बहुउद्देशाने महिला पोलिसांसाठी प्रथमच आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे. नाना पालकर स्मृती समिती आणि वैशाली फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या आरोग्य शिबिरात मोफत ' ब्रेस्ट कॅन्सर तपासणी ' करण्यात येणार आहे.

या नवीन उपक्रमाची सुरुवात खार (पश्चिम) पोलीस ठाणे येथे शुक्रवारी १३ जून रोजी सकाळी १०.०० वाजता होणार असून सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत शिबिराची वेळ असणार आहे. अभिनेते अरुण कदम यांच्या पत्नी वैशाली कदम यांचा वाढदिवस दरवर्षी ३० मे रोजी साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने गेल्या ५ वर्षांपासून अभिनेते अरुण कदम हे मुंबईत ठिकठिकाणी महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करून त्याद्वारे महिलांसाठी मोफत ' ब्रेस्ट कॅन्सर तपासणी ' करून देतात. आजपर्यंत शेकडो महिलांनी या आरोग्यदायी उपक्रमाचा लाभ घेतला आहे. त्यामुळे ' ब्रेस्ट कॅन्सर' चे वेळीच निदान करून उपचार करणे शक्य होते.

महिलांना ' ब्रेस्ट कॅन्सर' स्तर - १ अथवा स्तर - २ असल्याचे वेळीच समजले तर त्यावर तत्काळ उपचार केल्यास तो लवकरात लवकर बरा करता येतो आणि सदर पीडित महिलांची जीवघेण्या कॅन्सरपासून सुटका होते. त्यामुळे त्यांना आपले पुढील आयुष्य निरोगी व आनंददायी जगणे शक्य होते. त्यामुळे त्या महिलांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मोठा दिलासा मिळतो, असे अभिनेते अरुण कदम यांनी सांगितले.

याप्रसंगी, अभिनेते अरुण कदम यांच्यासह, नाना पालकर स्मृती समितीचे व्यवस्थापक कृष्णाजी महाडिक आणि साधावी डोके,वांद्रे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस अधिकारी, महिला पोलीस उपस्थित राहणार आहेत.

अभिनेते अरुण कदम यांच्या या आरोग्य सेवेचे आणि या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक करण्यात येते. शेकडो महिला त्यांना त्यासाठी दुवा देतात. असाच आरोग्यदायी उपक्रम राबविताना यंदा त्यांच्या मनात वेगळीच संकल्पना आली. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर म्हणून मुंबईची जगात ओळख आहे. असे म्हणतात की, मुंबई शहर झोपत नाही. येथे राहणारे मुंबईकर २४ तास म्हणजे रात्रंदिवस धावत असतात. अशा या मुंबई शहरात वाढत्या लोकसंख्येसोबत गुन्हेगारी सुद्धा घडत असते. या गुन्हेगारीला आवरणे, गुन्हेगारांना जीवाचे रान करून अथक प्रयत्न करून पकडणे आणि त्यांना त्यांच्या गुन्ह्याची शिक्षा करून त्यांना सुधारण्याची संधी देणे यासाठी मुंबई पोलीस दल कार्यतत्पर असते. या मुंबई पोलीस दलात पुरुष पोलीस, अधिकारी यांच्या सोबत खांद्याला खांदा लावून महिला पोलीस, महिला पोलीस अधिकारी वर्गही रात्रंदिवस कार्यरत असतो. ते सुद्धा आपला जीव धोक्यात घालून , मुंबईकरांच्या सुरक्षिततेसाठी झटत असतात. आपले घर, संसार सांभाळून मुंबई शहराची आणि दीड कोटींपेक्षाही जास्त मुंबईकरांची सेवा करीत आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावित असतात.

अनेक महिला पोलीस, महिला पोलीस अधिकारी यांनी तर चांगली कामगिरी करून पुरस्कार मिळविले आहेत. राज्याच्या सर्वोच्च अशा पोलीस महासंचालक पदावर देखील रश्मी शुक्ला यांसारख्या महिला अधिकारी आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडत आहेत.

या धावत्या मुंबईत आपले कर्तव्य रात्रंदिवस बजावताना कधी कधी या महिला पोलिसांचे, महिला पोलीस अधिकारींचे आपल्या व्यक्तिगत आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे त्यांना ' ब्रेस्ट कॅन्सर ' सारख्या आजाराचे निदान सुद्धा वेळेत करणे शक्य होत नाही. ही बाब ओळखून अभिनेते अरुण कदम यांनी, त्यांच्या पत्नी वैशाली यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधत १३ जूनपासून मुंबई पोलीस दलातील महिला पोलिसांसाठी प्रथमच आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे. नाना पालकर स्मृती समिती आणि वैशाली फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या आरोग्य शिबिरात मोफत ' ब्रेस्ट कॅन्सर तपासणी ' करण्यात येणार आहे. या नवीन उपक्रमाची सुरुवात खार (पश्चिम) पोलीस ठाणे येथे शुक्रवारी १३ जूनपासून करण्यात येणार आहे. या ठिकाणी किमान ३० महिला पोलिसांची मोफत ' ब्रेस्ट कॅन्सर तपासणी ' करण्यात येणार आहे.



## आजचे राशिभविष्य

**मेष**
विचारपूर्वक काम करण्यासाठी आणि योजना पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला असेल.तुमचा जीवनसाथी आणि नशीब दोन्ही पाठीशी असतील.

**वृषभ**
प्रॉपर्टी डीलर्सना मोठ्या डीलमधून चांगला फायदा होईल. आज तुम्हाला इतरांशी विचारपूर्वक बोलण्याची गरज आहे. तुम्ही आनंदी व्हाल.

**मिथुन**
तुम्ही जे काही काम सुरू कराल त्यात तुम्हाला नक्कीच यश मिळेल. घरापासून दूर शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक मेहनत करण्याची गरज आहे.

**कर्क**
तुमच्या मेहनतीचा फायदा तुम्हाला लवकरच मिळेल. तुमच्या गुणांची आणि तुमच्या कामाची प्रशंसा होऊ शकते. मुलांच्या बाजूने मनाला

**सिंह**
समाधान मिळेल. नवीन औद्योगिक उपक्रम सुरू करू इच्छिणाऱ्या किंवा नवीन नोकरीच्या संधी शोधत असलेल्यांसाठी हा काळ अनुकूल आहे.

**कन्या**
वित्ताशी संबंधित काही योजना बनवाल. आज तुम्ही कुटुंबाला एकत्र ठेवण्याची भूमिका पार पाडाल. आज तुम्ही असहाय व्यक्तीला मदत कराल. तुम्ही

**तूळ**
अनावश्यक वादांपासून दूर राहाल. तुमच्यासमोर जे काही कठीण प्रकरण आहेत, तुम्ही त्यावर चर्चा करू शकता, तथापि तुम्हाला यश मिळेल.


**वृश्चिक**
विद्यार्थी कोणत्याही विषयात त्यांच्या भावाची मदत घेऊ शकतात ज्यामुळे त्यांना खूप मदत होईल. जवळच्या व्यक्तीबद्दल विचार करून नाते सुधाराल.

**धनु**
काहीतरी साध्य कराल. तुमच्या सहकाऱ्यांच्या आणि मित्रांच्या पाठिंब्याने आज तुमच्या जीवनात सुरू असलेल्या समस्यांचे निराकरण होईल.

**मकर**
आईकडून काही चांगली बातमी मिळेल, ज्यामुळे तुमचे मन प्रसन्न राहील. आज, मित्रांच्या मदतीने तुम्हाला उत्पन्नाच्या संधी मिळतील.

**कुंभ**
तुमची आर्थिक स्थिती मजबूत कराल.अतिविचारामुळे तुम्हाला डोकेदुखीच्या समस्येला सामोरे जावे लागू शकते. तुमचे सोशल नेटवर्क अधिक मजबूत होईल.

**मीन**
व्यवसायात अनुभवी लोकांना भेटाल आणि त्यांच्याकडून व्यवसायाशी संबंधित माहिती मिळेल.व्यवसायाचा विस्तार करण्याच्या नवीन संधी मिळतील.






# उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागास आयएसओ दर्जा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



उल्हासनगर : शंभर दिवसांच्या कृती आराखड्यात कार्यालयाचा कायापालट करून सर्वेक्षण करण्यासाठी आलेल्या शासनाच्या समिती कडून कौतुकाची पोचपावती मिळवणाऱ्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने आयएसओ प्रमाणपत्राला गवसणी घातली आहे.प्रमाणपत्र मिळवण्यात सिंहाचा वाटा उचलणारे सहायक संचालक नगररचना ललित खोब्रागडे व त्यांच्या टीमचे महानगरपालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी आज गुरुवारी महासभा सभागृहात जाहीर सत्कार केला आहे.

नगररचना विभागातील कामकाजाला गती मिळण्यासाठी सहायक संचालक नगररचना ललित खोब्रागडे यांनी आधीचा जो डेव्हलपमेंट प्लॅन समजण्यात अडचण येत होती ती दूर करण्याकरिता विशेष प्रशिक्षणचे आयोजन केले. त्यामुळे सिटी सर्वेच्या सीट्स व डेव्हलपमेंट प्लॅन यांचा ताळमेळ बसला.प्लॅन नागरिकांना समजावा याकरिता नगररचना विभागाच्या

## ललित खोब्रागडे यांची महत्वपूर्ण भूमिका...

बाहेर स्क्रीन झळकवण्यात आली. बांधकाम परवाना कमी वेळेत मंजूर व्हावा व त्यात पारदर्शकता असावी यासाठी ऑनलाइन बिल्डिंग प्लॅन मॅनेजमेंट प्रणाली सुरू केली. संपूर्ण रेकॉर्ड हा आयएसओ मानकामध्ये बसावा यासाठी सर्व जुन्या फाईलींचे वर्गीकरण करून रेकॉर्ड रूम अद्यावत केले.त्यानंतर लोकसेवा हक्क कायद्यानुसार सर्व प्रक्रिया समाधानपूर्वक सुरू केल्या. पहिल्यांदा नगररचना विभागासाठी सॉफ्टवेअर तयार करण्यात आले. महानगरपालिकेला शंभर दिवसांच्या कृती आराखड्यात प्रथम क्रमांक व आयुक्त मनीषा आव्हाळे यांना सर्वोत्तम आयुक्त म्हणून घोषित करण्यापूर्वी शासनाच्या समितीने उल्हासनगर महानगरपालिकेचा आढावा घेऊन सर्वेक्षण केले होते. त्यावेळी समितीने नगररचना विभागाने जो कायापालट केला त्याचे कौतुक केले होते.

यासंदर्भात सहायक संचालक नगररचना ललित खोब्रागडे यांच्याशी विचारणा केली असता,आयएसओ प्रमाणपत्र मिळणे हे टीमवर्कचे फलित आहे.आम्ही आयुक्त मनीषा आव्हाळे यांचे मार्गदर्शन व सूचनांची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी केली.यासाठी नगररचनाकार विकास बिरारी,कनिष्ठ अभियंता संजय पवार,अधिकारी पियुष घरत,गणेश देवरे,किरण दुबे,दीपक कजानीया,हेमलता गावित,विद्या अढळ,अनिता हटाळे यांच्या सोबत सर्व कर्मचाऱ्यांनी रात्री उशिरापर्यंत काम केले.आणि आयएसओ प्रमाणपत्र मिळाले. आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी जेंव्हा सत्कार केला तेंव्हा सर्व अधिकारी,कर्मचारी सुखावून गेले होते असे ललित खोब्रागडे यांनी सांगितले.

# विमान दुर्घटनेतील मृतांना शिवसेनेतर्फे श्रद्धांजली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : अहमदाबाद येथे गुरुवारी झालेल्या दुर्दैवी विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या यात्रेकरू व वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट पेण तालुका शिवसेनेतर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.या प्रसंगी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दुःख व्यक्त करत कुटुंबीयांच्या दुःखात आपण सहभागी असल्याची भावना व्यक्त केली.

अहमदाबाद विमान दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरे यांनी त्यांच्या वाढदिवशी होणारे सर्व कार्यक्रम रद्द केल्यामुळे हा उपक्रम पुढे ढकलण्यात आल्याची माहिती तालुकाप्रमुख समीर म्हात्रे यांनी दिली.

यावेळी बोलताना समीर म्हात्रे म्हणाले की, "ही दुर्घटना अत्यंत दुःखद असून शिवसेना संपूर्णपणे शोकसंतप्त कुटुंबीयांच्या पाठीशी आहे." या श्रद्धांजली सभेला जिल्हा समन्वयक नरेश गावंड, तालुकाप्रमुख समीर म्हात्रे, भगवान पाटील, महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका दीपश्री पोटफोडे, वैशाली समेळ, राजश्री घरत, मेघना चव्हाण, युवा सेनेचे निलेश म्हात्रे, योगेश पाटील, कांतीलाल म्हात्रे, चेतन मोकल, समीर साटी, प्रथमेश पोटफोडे, कृतेश खाडे आणि मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# दप्तर दिरंगाईबाबत कारवाईची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर प्रतिनिधी(नरेंद्र पाटील) : शहापूर वनक्षेत्र विभागाकडून माहिती अधिकार कायद्याच्या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याने सदर या दप्तर दिरंगाई कायद्यानुसार शिस्त भंगाची कार्यवाही करण्याची मागणी व्हिसल ब्लोअर मानवाधिकार संरक्षण कार्यकर्ता, लोकसेवा हक्क अधिनियम व माहिती अधिकार अभ्यासक अनिल महाडिक यांनी संबंधित वरिष्ठ विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे. शहापूर वनविभाग कार्यालयात माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत महाडिक यांनी माहितीसाठी अर्ज करण्यात आला होता. परंतु शहापूर वनक्षेत्रपाल विभाग यांच्या कडून सदर जनमाहिती अधिकारी म्हणून त्या आदेशाची अंमलबजावणी न करता जाणीवपूर्वक दुर्लक्षित केले आहे असे महाडिक यांनी म्हटले आहे. सदर, माहिती लपवून भुमाफियांना संरक्षण देण्याचा हेतूपुरस्सर प्रयत्न केला आहे असा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे शासकीय कामकाजात जाणूनबुजून विलंब व टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होत असल्याने जन माहिती अधिकारी हे दप्तर दिरंगाई कायदा, 2006 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम, 1979 अंतर्गत दोषी धरले जावून त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी अनिल महाडिक यांनी केली आहे.

# दावडी येथे उभारलेली आठ मजल्यांची इमारत जमीनदोस्त





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वारसांच्या जागेवर दावडी येथे उभारलेली तळ अधिक आठ मजल्याची इमारत संपूर्ण जमीन दोस्त करण्यात आली. ही इमारत तोडण्यासाठी अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे व उपायुक्त अवधूत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त भारत पवार यांच्या पथकाने हि कारवाई केली.

ही इमारत तोडण्यासाठी एकूण 23 दिवस लागले यामध्ये सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी ही काम चालू ठेवण्यात आले. तसेच ही इमारत तोडण्यासाठी एकूण सहा वेळा त्या भागातील संपूर्ण वीजपुरवठा खंडित करावा लागला. इमारत तोडण्याकरिता लागणारी मशीन हाय जो क्रशर ही मशीन मुख्य रस्त्यापासून इमारतीपर्यंत आणण्यासाठी खूपच कसरत करावी लागली. दावडी सर्कल ते निष्कासन ठिकाण यापर्यंत आणताना सर्व इलेक्ट्रिक वायरी केबल एसटीपी लाईन वायर इत्यादी 20 ते 25 फूट उंच कराव्या लागल्या त्यानंतर त्या मशीनचा बूम रस्त्यावर पोल वायरीला न लावता जागेवर घेण्यात आला.

इमारत तोडत असताना मशीन इन बॅलेन्स झाल्यामुळे जपान येथून तातडीने इंजिनियर्स बोलवून त्यांच्या मार्गदर्शनाखाली ऑपरेटरने मशीन चालवली तसेच पाण्याची टाकी तोडण्यासाठी साधारण दीड मजले इतका उंच रॅम बनवण्यात आला ही इमारत तोडत असताना शेजारील इमारतीचे पार्किंग मधील सर्व पत्रे व शेड यांचे नुकसान झाले तसेच शेजारी असलेल्या हॉलचे गोडाऊन रिकामे करावे लागले. त्याचेही सर्व पत्रे इमारतीच्या स्लॅबचा भाग पडल्यामुळे तुटले गेले.तसेच इमारती मागील काम चालू असलेल्या ठिकाणी लेबर साठी उभारलेल्या टेम्परवारी शेड यांचे नुकसान झाले. मशीन बाहेर काढताना काही केबल तोडाव्या लागल्या तसेच काही पाण्याच्या लाईन तुटल्या. ही कारवाई चालू असताना जागा मालकांनी बराच वेळा विरोध केला परंतु त्यांना योग्य तो समज देऊन काम चालू ठेवण्यात आले व अखेर संपूर्ण निष्कासन पूर्ण झाले असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी दिली.

# केडीएमसीच्या 'फेरीवाला हटाव' पथकावर हल्ला



सहाय्यक आयुक्त आणि सुरक्षा बलाच्या महिलेवर हल्ला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिकेच्या फेरीवाला कारवाई पथक शुक्रवारी सायंकाळी स्टेशन परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्टेशन रोड कारवाई करण्यासाठी गेले असता. संतप्त फेरीवाल्यांनी कारवाई पथकाला जोरदार विरोध करत जप्त केलेला माल आम्हाला परत द्या, अशी मागणी करत फेरीवाला पथकाचा पाठलाग केला. यात फेरीवाला हटाव पथक आणि फेरीवाले यांच्यात तु तु मै मै झाली.

प्राप्त माहिती नुसार, "क" प्रभागाचे सहाय्यक आयुक्त धनंजय थोरात यांच्या फेरीवाला हटाव पथकाने कल्याण पश्चिमेतील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते कल्याण स्टेशन रोड, स्कॉंय वॉंक परिसरात फेरीवाला हटाव कारवाई केली. स्कॉंय वॉंक कारवाई नंतर परत आलेल्या फेरीवाला हटाव पथकास परत फेरीवाले फुटपाथ व्यापत आपले बस्तान मांडलेले दिसल्याने, फेरीवाला हटाव पथकाने फेरीवाल्यांवर जप्तीची कारवाई सुरू केली. या कारवाईत काही महिला फेरीवाल्यांनी आमाच्या मालाचे नुकसान केले, अशी आरोड करीत तु तु मै, मै केली आणि आरेरावी करीत महिला सुरक्षा बलाच्या कर्मचारी व आधिकारी यांच्यावर धावून जात आक्रमक पवित्रा घेतला.

या संदर्भात सहाय्यक आयुक्त धनंजय थोरात यांनी कारवाईला विरोध करणाऱ्या, तसेच फेरीवाला हटाव पथकाच्या कर्मचाऱ्यांच्या आंगावर धावून जाणाऱ्या फेरीवाल्या विरोधात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू केली. प्रशासनाच्या कारवाई बडग्यामुळे संतप्त फेरीवाल्यांनी महापालिकेचे मुख्यालय गाठले. सुरक्षारक्षकाने प्रवेश द्वार बंद केल्याने. संतप्त फेरीवाले प्रवेशद्वारा बाहेर जमले. आमचा जप्त केलेला माल परत केला नाही तर आम्ही याच ठिकाणी आमच्या जीवाचे बरे वाईट करून घेऊ असा इशारा दिला. कारवाई पथकाने आमचा माल जप्त करून आम्हाला मारहाण केल्याचा आरोप फेरीवाल्यांनी करीत गादारोळ घातला,असेही समजते.

स्टेशन परिसरातील 150 मीटर परिसर फेरीवाला मुक्त परिसर असावा, असेही असताना फेरीवाला हटाव पथकाने कारवाई चा बडगा उगारला तरी समस्या कायम असल्याचे दिसून येत आहे. स्टेशन परिसरातील रस्त्यालगत पार्क केलेल्या दुचाकी, फेरीवाला बस्तान आणि या सर्वातून अडथळयांची शर्यत पार करीत ये जा करणार्या पादचाऱ्यांना कधी, कसा दिलसा मिळेल हे चित्र बदलणार कधी असा सवाल यानिमित्ताने उभा ठाकला आहे.

# शेंद्रुण येथील राईस मिल चेअरमन पदी मार्तंड पाटोळे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



शहापूर : तालुक्यातील प्रतिष्ठित असलेल्या किसान सहकारी भात गिरणीच्या चेअरमन पदी शेंद्रुण येथील मार्तंड पाटोळे यांची निवड करण्यात आली. संचालक मंडळाच्या २०२५/२६ ते २०३०/३१ च्या निवडणुकीत शेतकरी विकास सहकार सर्व पक्षीय पॅनलने वर्चस्व राखत एक हाती विजय संपादन केला.दरम्यान या पॅनलचे इतर मागास प्रवर्गातून निवडून आलेले मार्तंड जगनाथ पाटोळे यांची चेअरमन पदी बिनविरोध निवड करण्यात आली.तर व्हॉइस चेअरमन पदी हर्षला हरिश्चंद्र पाटील यांची निवड करण्यात आली.यावेळी भाजपचे माजी तालुकाध्यक्ष तुकाराम भाकरे,पंचायत समितीचे माजी उपसभापती पद्माकर वेखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

किसान सहकारी भात गिरणीच्या निवडणुकीत परिवर्तन विकास सहकार पॅनल व शेतकरी विकास सहकार सर्व पक्षीय पॅनल यांच्या मध्ये झालेल्या लढतीत शेतकरी विकास सहकार सर्व पक्षीय पॅनलने बाजी मारली.या निवडणुकीत मार्तंड पाटोळे,अंजना तुकाराम भाकरे,हर्षला पाटील,अरविंद मांजे,केशव भाकरे,जयवंत जागरे,कृष्णा सातपुते,निलेश शिंगळे,शंकर भाकरे,गोपीनाथ भोईर,मधुकर ठाकरे,विलास पाटोळे,अजित पाटोळे,तुकाराम धिर्डे,मदन म्हस्कर,गोपाळ दांडकर,अनिल भोईर,गुरुनाथ शेलवले,केशव निमसे,लक्ष्मण पवार व काळुराम रेरा आदी संचालक निवडून आले.

# नांदगाव येथे रस्ता सुरक्षतेबाबत पोलिसांचे मार्गदर्शन





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : प्रवीण साळुंखे , अप्पर पोलीस महासंचालक (वाहतूक )महाराष्ट्र राज्य मुंबई, रूपाली अंबुरे पोलीस अधीक्षक महामार्ग ठाणे परिक्षेत्र, संतोष खानविलकर पोलीस उपअधीक्षक महामार्ग ठाणे विभाग (अतिरिक्त कार्यभार )यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्धीज` इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी नांदगाव येथे महामार्ग पोलीस मदत केंद्र माळशेज घाट यांच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान वाहतूक नियमांचे मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. सदर वेळी राजेंद्र ठाकूर पोलीस उपनिरीक्षक पोलीस मदत केंद्र माळशेज यांनी विद्यार्थ्यांना जीवन अनमोल आहे .प्रत्येकाने वाहतुकीचे नियम पाळले तर अपघाताची संख्या देखील कमी होते.रस्ता सुरक्षा, वाहतूक नियमाबाबत मार्गदर्शन केले. पोलिस अंमलदार संजय घुडे यांनी वाहतूक नियम गाण्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाहतूक नियमाबाबत मार्गदर्शन केले. तसेच पोलीस अंमलदार शरद पाखरे यांनी इ चलन, इंटरसेप्टर वाहन, व ब्रेथ अनालायझर मशीन द्वारे केसेस कशा होतात त्याबाबत मार्गदर्शन केले. बापूसाहेब देशमुख सेवा प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष संतोष देशमुख यांनी कार्यक्रमासाठी जागा उपलब्ध करून दिली.कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रजनीकांत काकडे प्रा. मोहित जाधव, तेजस्विनी असावे, हर्षल विशे, प्रतीक्षा सोनवणे ,भास्कर आलम यांनी केले. कार्यक्रमाचे व्हिडिओग्राफी जय मनोरे यांनी केली. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत पौडवाल यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# शहापूर उपजिल्हा रुग्णालयंच व्हेंटिलेटरवर

## रुग्णांना घ्यावा लागतो खाजगी डॉक्टरांचा आधार माजी आमदारांनी मांडली व्यथा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



शहापूर : शहापूर हा आदिवासी बहुल तालुका असून येथील उपजिल्हा रुग्णालयात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे,रुग्ण व नातेवाईकांसाठी फॅनची व्यवस्था नसणे,अनेक रिक्त पदे न भरणे,प्रसूती गृहात सुविधांचा अभाव असणे, तज्ञ डॉक्टरांची वाणवा असणे अशा अनेक त्रुटींवर माजी आमदार पांडुरंग बरोरा यांनी बोट ठेवले असून या उपजिल्हा रुग्णालयात अध्ययावत सेवा उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी नुकतेच भाजपवासी झालेले मा. आमदार पांडुरंग बरोरा यांनी आरोग्य मंत्री प्रकाश अबीटकर यांच्याकडे केली आहे.

ठाणे जिल्हयातील शहापूर हा एकमेव आदिवासी व दुर्गम तालुका आहे.शहापूर येथे १०० खाटांचे उपजिल्हा रूग्णालय असून या रूग्णालयावर अवलंबून असणाऱ्या रूग्णांची संख्या देखिल मोठी आहे. शहापूर तालुक्यातील बहुतांशी जनता उपचारासाठी उपजिल्हा रूग्णालयाचा आधार घेत असुन रूग्णालयातील डॉक्टरांची पदे रिक्त असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे.उपजिल्हा रूग्णालयात या महिन्यात सर्पदंश झाल्याने रूग्णालयात दाखल झालेल्या ३ रूग्णांचा उपचाराअभावी मृत्यू झाल्याने नागरीकांमध्ये रूग्णालयाबाबत असंतोष पसरला आहे.उपजिल्हा रूग्णालयातील वारंवार असणाऱ्या रिक्त पदांमुळे गोरगरीब नागरीकांना टेस्ट आणि उपचारासाठी खाजगी रूग्णालयांचा आधार घ्यावा लागत असून ही खर्चिक आणि खेदाची बाब असल्याचे श्री. बरोरा यांनी नमूद केले आहे. तसेच रूग्णालयासाठी मंजूर असलेली प्रमुख पदे, स्त्रीरोगतज्ञ,भूलतज्ञ,बालरोग तज्ञ, सी.टी.स्कॅन ऑपरेटर वारंवार रिक्त असल्याने उपजिल्हा रूग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या नागरीकांची प्रचंड गैरसोय होत असते.दरम्यान नागरिकांची आरोग्य विषयक गैरसोय लक्षात घेता शहापूर उपजिल्हा रूग्णालयातील डॉक्टरांची रिक्तपदे भरणे, ट्रामा केअर सेंटर मंजूर करणे, सिटीस्कॅन सेवा कायम उपलब्ध ठेवणे, अतिदक्षता कक्ष,व्हेंटिलेटर, पुरेसा व अत्यावश्यक औषधसाठी उपलब्ध करणे व रूग्णालय व परिसर स्वच्छ ठेवणेबाबत संबंधितांना त्वरीत सूचना कराव्यात असे निवेदनाद्वारे सूचित करण्यात आले आहे.

### नाव मोठं ; लक्षण खोटं

शहापूर उपजिल्हा रूग्णालयासाठी प्रशस्त इमारत उपलब्ध असून देखिल इमारतीमधे व आजुबाजूच्या परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. तालुक्यातील बराचसा भाग मुंबई-आग्रा महामार्गालगत असून महामार्गावर मोठ्या प्रमाणावर अपघात घडत असतात. अपघातग्रस्तांवर तातडीने उपचार होणे गरजेचे असूनही ग्रामिण भागातील किंवा अपघातग्रस्तांना ठाणे,मुंबई येथे उपचारासाठी जावे लागते.हे त्रासदायक,खर्चिक आणि दुर्दैवी देखील आहे.ट्रामा केअर सेंटर शहापूर मध्ये सुरू झाल्यास रूग्णांची अपघातग्रस्त रूग्णांना वेळेत उपचार मिळाल्यास त्यांचा जीव वाचविणे शक्य होईल.ग्रामीण आणि दुर्गम भागातील आरोग्य व्यवस्था सुस्थितीत ठेवण्यासाठी आरोग्य विभागाने शर्थीचे प्रयत्न करणे गरजेचे आहेत.या उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची गैरसोय होऊ नये त्यांना सर्व आरोग्यविषयक आवश्यक सेवा मिळाव्यात यासाठी शासनाकडून यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यात आली; पण तज्ज्ञ कर्मचाऱ्यांचा अभाव असल्याचे सांगत सोनाग्राफी,बाह्यरुग्ण तपासणी विभाग,गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी केली जात नसल्याची रुग्णांच्या नातेवाईकांची ओरड आहे



# अकरावी व पदवी प्रवेशासाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /ठाणे : ठाणे शहरामध्ये सध्या सुरू असलेल्या ११ वी व पदवीच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत अनेक विद्यार्थी आणि पालक अडचणीत सापडले आहेत. नव्याने सुरु झालेल्या ऑनलाइन पोर्टलची प्रक्रिया क्लिष्ट वाटत असून त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे अर्ज अद्याप भरले गेलेले नाहीत. या सर्व अडचणी लक्षात घेता, विद्यार्थ्यांना समर्पक मार्गदर्शन मिळावे व आवश्यक शासकीय दाखले मिळवण्यासाठी मदत व्हावी या उद्देशाने कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार मा. ॲड. निरंजन डावखरे यांच्या पुढाकाराने दि. १६ जून २०२५ रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत मो.ह. विद्यालय, ठाणे येथे "विद्यार्थी संवाद व मार्गदर्शन शिबिर" आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये ठाणे जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (माध्य.) देविदास महाजन, ठाणे तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार दिनेश पैठणकर, मुंबई विद्यापीठाचे अभ्यासमंडळ अध्यक्ष व प्राचार्य डॉ. सुनील कर्वे आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. कीर्ती आगाशे हे मार्गदर्शन करणार आहेत.

तसेच प्रवेश प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली जाणार असून विद्यार्थ्यांच्या अडचणींवर ठोस उपाय सुचवले जातील. याचवेळी विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आवश्यक शासकीय कागदपत्रे व दाखले यांचे वाटप देखील करण्यात येणार आहे.

तरी विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार मा. ॲड. निरंजन डावखरे यांनी केले आहे.

## मोबाईल हाताळण्यास न दिल्याने
# भिवंडीत मैत्रिणीस मारहाण



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : मित्र व मैत्रीण गप्पा मारीत असताना मैत्रिणीने हातातील मोबाईल फोन बघायला न दिल्याच्या रागातून मित्राने मैत्रिणीस मारहाण केल्याची खळबळजनक घटना भिवंडीतील रांजनोली या भागात घडली आहे.त्यामुळे पोलिसांनी आलेल्या तक्रारी वरून गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पीडित १९ वर्षीय मैत्रीण भिवंडीतील राजनोली येथील महेंद्रा या इमारतीत राहत असून तिचा गैबीनगर येथील मित्र सैफ अली अन्सारी हा तिच्या घरी रात्री दहा वाजता गप्पा मारत असताना मित्राने पीडित मैत्रिणीचा मोबाईल बघण्यासाठी मागितला. मैत्रिणीने मोबाईल न दिल्याने त्याचा राग येऊन मित्र सैफ अली याने पीडित मैत्रिणीस शिवीगाळ करीत ठोशाबुक्याने, लाथेने मारहाण करून तिचे कपडे फाडुन स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. या प्रकरणी पीडित मैत्रिणीने दिलेल्या तक्रारीवरून कोनगाव पोलिस ठाण्यात मित्र सैफअली विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस फरार सैफअली याचा शोध घेत आहेत.

## सप्तशृंगी इमारत दुर्घटना
# मृतांच्या कुटुंबीयांना धनादेशाचे वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महिनाभरापूर्वी कल्याण पूर्व येथील सप्तशृंगी इमारत कोसळण्याची घटना घडली होती. या दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेत मृत झालेल्यांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची आर्थिक मदत मिळावी यासाठी आमदार सुलभा गायकवाड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला होता. आज हे पाच लाख रुपयांचे धनादेश तहसीलदारांकडे प्राप्त झाले असता तहसीलदारांनी हे धनादेश आमदार सुलभा गायकवाड यांच्या हस्ते मृतांच्या कुटुंबीयांकडे सुपूर्द केले आहेत.

तर याबाबत बोलताना आमदार सुलभा गायकवाड यांनी सांगितले की, संकटाच्या काळात सरकारची साथ कायम असून २० मे रोजी कल्याण पूर्वेतील चिकणीपाडा येथे घडलेल्या दुर्दैवी इमारत दुर्घटनेत सहा निरपराध नागरिकांचा दुःखद मृत्यू झाला. या दुःखद प्रसंगी मयत व्यक्तींच्या कुटुंबीयांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या

### आमदार सुलभा गायकवाड यांच्या हस्ते देण्यात आली मदत



मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मंजूर झालेली प्रत्येकी ₹५ लाख रुपयांची मदत आज आमदारांच्या जनसंपर्क कार्यालयात, ग्राम महसूल अधिकारी धनश्री जाधव यांच्या उपस्थितीत संबंधित कुटुंबीयांना सुपूर्द करण्यात आली.

या तत्पर मदतीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे आणि तहसीलदार सचिन शेजाळ यांचे आभार मानत आपत्तीमधील आधार हीच खरी लोकसेवा असल्याचे आमदार सुलभा गायकवाड यांनी सांगितले.



प.पू.स. रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट,
भोगावती नगर(तानसा), ता.शहापूर, जि.ठाणे

आपण केवळ वर्तमान काळातच राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे व आपली राहणी अत्यंत साधी असावी. ईश्वरावर सद्गुरुंवर पूर्ण विश्वास असावा. सुखी जीवनाची ही मार्गदर्शक तत्वे आहेत. ही तत्वे अंगी करण्यासाठी आपणाला कठोर परिश्रमाची आवश्यकता आहे. केवळ देवाला दोष न देता शुद्ध व उपयुक्त वातावरणात राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गुरू ज्ञान बोधाने मानसिक उन्नती साधावी.

गुरूमाऊली-
प.पू.स. अलोकनाथजी महाराज

# श्री सिद्धिविनायक अन्नछत्र मंडळ एक सामाजिक उपक्रम






दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /टिटवाळा : श्री सिद्धिविनायक अन्नछत्र मंडळ एक उपक्रम नसून त्या मार्फत सामाजिक बांधिलकी जपण्याचा अनोखा उपक्रम आहे मांडा वेस्टमधील दुधे मावशी यांचे संपूर्ण कुटुंब म्हणजे एक गतिमंद मुलगा दुसरा मुलगा लकव्याने पूर्ण बेडरेस्ट स्वतः दुधे मावशी मोतीबिंदूने त्रस्त असल्याने त्यांनी इकडे तिकडे मदतीसाठी धडपडत असताना त्या आमच्या कार्यालयात आले असता त्यांच्या समस्या पूर्णपणे ऐकून श्री सिद्धिविनायक अन्नछत्र मंडळाच्या वतीने त्यांना अन्नधान्य व गॅस सिलेंडर देऊन औषधांचा पुढील खर्च अन्नछत्र मंडळाच्या वतीने करणार असून त्यांचा मोतीबिंदू ऑपरेशन देखील करण्यात येईल तसेच आम्ही अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून फक्त अन्नदान रुपी सेवा न करता गोरगरीब गरजवंत नागरिक यांना शक्य तेवढे होईल ती मदत करणे हा मुख्य उद्देश आहे श्री सिद्धिविनायक अन्नछत्र मंडळाच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक साहित्य देण्याचा उपक्रम हाती घेतला जाणार आहे तसेच आरोग्य शिबिर देखील राबवण्याचा मानस असून नागरिकांनी तसेच अन्नदात्यांनी अन्नदान सभेत जास्तीत जास्त सहभाग घ्यावा ही विनंती. श्री सिद्धिविनायक अन्नछत्र मंडळाच्या वतीने वाढदिवस, पुण्यस्मरण यासाठीचे अन्नदान सेवा देखील संबंधितांच्या नावाने केले जातात. लवकरच बसण्यासाठी आसन व्यवस्था,पंख्यांची व्यवस्था, पिण्याच्या पाण्यासाठी कुलर व्यवस्था व अजून इतर सोयी सुविधा करण्यासाठी प्रयत्नशील आहोत.

श्री सिद्धिविनायक अन्नछत्र मंडळाचे अधिकृत बँक खाते असून ज्या अन्नदात्यांना अन्नदान सेवेसाठी देणगी अथवा सहभाग घ्यायचा असेल ते ऑनलाईन देणगी सुद्धा देऊ शकतात.

आपला विश्वासू : श्री विजय(भाऊ) मारुती देशेकर ,संस्थापक अध्यक्ष, श्री सिद्धिविनायक अन्नछत्र मंडळ टिटवाळा -७२०८१३६४११

## शनिशिंगणापूर मंदिर व्यवस्थापनाने
# सात्त्विकतेचा विचार करूनच कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी
### - हिंदु जनजागृती समिती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : श्री शनिशिंगणापूर मंदिरात मुसलमान कर्मचाऱ्यांकडून पवित्र चौथऱ्यावर ग्रील बसवण्याच्या प्रकारामुळे हिंदू समाजात तीव्र संताप होता. यानंतर मंदिर प्रशासनाने ११४ मुसलमान कर्मचाऱ्यांना कामावरून हटवले, ही योग्य आणि वेळेवर उचललेली कृती आहे. हिंदु जनजागृती समिती, महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि इतर हिंदुत्वनिष्ठ संघटनांतर्फे या निर्णयाचे अभिनंदन करण्यात येत आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या नियंत्रणात असलेल्या अन्य देवस्थानांमध्येही अशा अन्य धर्मीय कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांना तात्काळ सेवामुक्त करण्यात यावे, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे. "मंदिर हे श्रद्धेचे केंद्र असून तेथे कर्मचाऱ्यांची श्रद्धा व आचार धर्मसंगत असणे आवश्यक आहे. मंदिर व्यवस्थापनाने सात्त्विकतेचा विचार करूनच कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी," असे मत हिंदु जनजागृती समितीचे राज्य संघटक सुनील घनवट यांनी व्यक्त केले आहे.




## धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत
# रायगड जिल्ह्यात शिबिरे



> १६ ते ३० जूनदरम्यान लाभार्थ्यांना विविध सेवा
> – जिल्हाधिकारी किशन जावळे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : देशातील आदिवासी बांधवांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात "धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DA-JGUA)" संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे. याच धर्तीवर रायगड जिल्ह्यातील १४ तालुक्यांतील ११३ आदिवासी गावांमध्ये या अभियानाची अंमलबजावणी होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हे अभियान प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय अभियान (PM-JANMAN) च्या धर्तीवर असून, गावपातळीवर थेट शिबिरे आयोजित करून विविध शासकीय योजनांचे लाभ आदिवासी लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट आहे.

या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. जिल्हास्तर समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी तर सह-अध्यक्ष जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असतील. प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग, पेण हे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

*१६ ते ३० जूनदरम्यान गावागावांत शिबिरे*

जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार, रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये १६ जून ते ३० जून २०२५ या कालावधीत उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्या माध्यमातून गावपातळीवर शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या शिबिरांमध्ये आधार कार्ड, आयुष्मान भारत कार्ड, पीएम किसान सन्मान योजना, जन धन खाते, शिष्यवृत्ती कव्हरेज, उज्वला गॅस योजना, जातीचे दाखले, रहिवासी दाखले, घरकुल योजना, पीएम मातृ वंदना योजना, आरोग्य तपासणी अशा अनेक योजनांचे लाभ दिले जाणार आहेत.

*११३ गावांमध्ये अभियानाचा विस्तार*

या अभियानांतर्गत लाभ देण्यात येणाऱ्या ११३ गावांची तालुकानिहाय संख्या पुढीलप्रमाणे आहे.

उरण (२), पनवेल (१४), कर्जत (२४), खालापूर (१०), पेण (२०), अलिबाग (१३), मुरूड (२), रोहा (९), सुधागड (१०), माणगाव (२), तळा (१), श्रीवर्धन (३), म्हसळा (१), महाड (२).

## विकसित भारतासाठी
# नवीन शैक्षणिक धोरण पूरक ठरेल : केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान म्हणाले की,मुंबई ही स्वप्नांची नगरी आहे त्याचबरोबर ही आर्थिक राजधानी देखील असून आगामी कालावधीत मुंबई येथे शिक्षणाचे हब होण्यासाठी परदेशी पाच विद्यापीठांचा खूप महत्त्वाचं योगदान राहील. भारत हा प्राचीन काळापासून शिक्षण क्षेत्रात जागतिकस्तरावर नावलौकिक राहीला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये विकसित भारतची स्वप्न साकारण्यासाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत. नवीन शैक्षणिक धोरणामुळे जागतिक पातळीवरच्या विद्यापीठांना देखील आपल्या संस्था भारतात सुरू करता येणार आहेत त्याचबरोबर भारतातील शिक्षण संस्थांना परदेशामध्ये आपल्या शाखा उघडता येणे शक्य होणार आहे. भारतात जागतिक दर्जाचे शिक्षण विद्यार्थ्यांना कमी खर्चात उपलब्ध होईल. आज भारतातील आयआयटी, आयआयएम, आयएफ, सिम्बॉयसिस यासारख्या संस्था परदेशामध्ये सुरू झाल्या आहेत.परदेशी विद्यापीठ भारतात येवून शिक्षण देणार भारताला विकसित बनवण्यासाठी आणि शिक्षण क्षेत्रात पुढे नेण्यासाठी हा निर्णय खूप महत्त्वाचा आहे असेही केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान म्हणाले.

यावेळी गुजरात अहमदाबाद विमान अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या प्रवाश्यांना यावेळी श्रध्दांजली वाहण्यात आली.मुख्यमंत्री यांचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ ढवसे यांनी सुत्रसंचालन केले.प्रास्ताविक सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी केले.यावेळी केंद्रीय शिक्षण सचिव विनित जोशी यांनी मनोगत व्यक्त केले.

### नवी मुंबईत जागतिक दर्जाची पाच विद्यापीठे

युनिव्हर्सिटी ऑफ ॲबरडीन, यूकेमधील सर्वात जुन्या विद्यापीठांपैकी एक आणि भारतात कॅम्पस स्थापन करणारे पहिले स्कॉटिश विद्यापीठ असून 200 हून अधिक भारतीय विद्यापीठे आणि संशोधन केंद्रांसह अनेक दशकांच्या विद्यापीठ भागीदारी यामध्ये असून आयआयटी - इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी; एम्स - ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस; मणिपाल अकादमी; आयसीएआर - इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च, आयसीएमआर - इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च आणि दिल्ली विद्यापीठ यांचा समावेश आहे.

जगातील टॉप १०० विद्यापीठांमध्ये स्थान मिळवलेले आणि आयव्ही लीग समतुल्य संस्था आणि मुंबईत कॅम्पस स्थापन करणारे ऑस्ट्रेलियातील प्रतिष्ठित ग्रुप ऑफ एट (Go8) विद्यापीठांमध्ये पहिल्या क्रमांकावर असलेले वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ. भारतीय विद्यार्थ्यांच्या आकांक्षा आणि भविष्यात जागतिक कार्यबल आणि अर्थव्यवस्थेच्या विकसित होत असलेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केलेले विज्ञान,औद्योगिक व इंजिनिअरींग या क्षेत्रात (STEM) व्यवसाय या विषयांमध्ये पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम असतील.

यॉर्क विद्यापीठ ही यूकेमधील सर्वात प्रतिष्ठित संशोधन-केंद्रित संस्थांपैकी एक आहे तसेच ते रसेल ग्रुपची सदस्य आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सायबर सुरक्षा, व्यवसाय, अर्थशास्त्र आणि सर्जनशील उद्योगांसह संगणक विज्ञानातील अत्याधुनिक पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध होतील. उदयोन्मुख क्षेत्रातील कार्यक्रम - एआय, सायबर सुरक्षा, सर्जनशील उद्योग - जागतिक उद्योगांच्या इनपुटसह डिझाइन केले जातील.भारतीय विद्यार्थ्यांसाठी नोकरीचा संधी उपलब्ध होतील.

इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (इलिनॉय टेक) हे स्वतंत्ररित्या पदवी देणारे आणि भारतात कॅम्पस स्थापन करणारे पहिले अमेरिकन विद्यापीठ आहे.संगणक विज्ञान, अभियांत्रिकी आणि व्यवसाय यासारख्या उच्च मागणी असलेल्या क्षेत्रांमध्ये पदवीपूर्व आणि पदवीधर शिक्षण उपलब्ध होतील. त्यांचा प्रसिद्ध एलिव्हेट प्रोग्राम देखील ते राबवणार आहेत. जो सर्व विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, संशोधन, स्पर्धा उपलब्ध करून देईल.

युरोपमधील प्रीमियम डिझाइन शाळांपैकी एक, इस्टिटुटो युरोपियो डी डिझाइन (IED) फॅशन, उत्पादन डिझाइन आणि व्हिज्युअल कम्युनिकेशनमध्ये जागतिक दर्जाचे कौशल्य उपलब्ध करून देईल.

# किसळ गावातील तरूणाचा सर्प दंशाने मृत्यू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /मुरबाड : दिनांक ११/६/२०२५ रोजी किसळ या गावी पहाटे ४ च्या सुमारास प्रदीप दत्तात्रय माळवे वय वर्ष ४३ यांना काहीतरी चावल्याचा अंदाज आला असता त्यांनी अंथरूण झटकले तेव्हा त्यांना मण्यार हा विषारी साप अंथरुणात दिसला त्यांनी त्या सापाला पकडले आणि त्वरित ही घटना त्यांचे चुलत भाऊ यांना फोन करून सांगितली ते बाजूला राहत असल्याने ते लगेच मदतीसाठी आले आणि त्यांना घेऊन टोकावडे या शासकीय रुग्णालयात घेऊन गेले मात्र तिथे या विषारी स्वरूपाचा सर्प दंशावर कोणतेही औषध उपलब्ध नाही त्या कारणाने तेथील डॉक्टरांनी पेशंटला मुरबाड या तालुक्याच्या ठिकाणी घेऊन जाण्याचा सल्ला दिला रात्र खूप होती म्हणून रुग्णवाहिका मिळेल का असे विचारले असता तेथील उपलब्ध डॉक्टरांनी १०८ वर फोन करून रुग्णवाहिका बुक करा असे सांगितले त्यातही जवळपास २० ते २५ मिनिटे लागली त्यानंतर रुग्णवाहिका उपलब्ध करण्यात आली पुढे त्यांचा चुलत भावाने आणि एका शेजाऱ्याने यांनी त्वरित पेशंटला मुरबाड या ठिकाणी घेऊन जाण्याचे ठरवले मात्र टोकावडे ते मुरबाड हा अंतर जास्त असल्याकारणाने तसेच रस्त्याचे काम चालू असल्याने पेशंटची तब्येत ही खूप बिघडली परिणाम स्वरूप वेळेवर टोकावडे शासकीय रुग्णालयात औषध उपचार तसेच वेळेत मदत न



झाल्याने मुरबाड शासकीय रुग्णालयात पेशंटला मृत घोषित करण्यात आले, त्यांच्या पश्चात त्यांचे वयस्कर वडील पत्नी आणि सहा वर्षाचा मुलगा आहे , कमावती व्यक्ती अशी अचानक गेल्याने त्यांच्या परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

दरम्यान सर्प चावून मृत्यू झाल्याच्या अनेक घटना मुरबाड शहापूर तालुक्यात घडत आहेत जिल्ह्यातील आरोग्य विभागाचे मात्र याकडे सपशेल दुर्लक्ष करीत असून नागरिकांचे जिव जात असताना आरोग्य यंत्रणा मात्र झोपा काढत आहेत. किसळ घटने बाबत रूग्णालय अधिक्षकांशी संपर्क केला असता फोन उचलला गेला नाही.

> ग्रामीण रुग्णालय टोकावडे महाराष्ट्र शासनाने उपजिल्हा रूग्णालयाचा दर्जा दिला असला तरी ऑक्सिजन बेड सारख्या सुविधा होणे गरजेचे आहे. पावसाळ्यात शेतकऱ्यांनी गावठी औषधाकडे वेळ न घालवता वैद्यकीय मदत घ्यावी
> – प्रकाश पवार, सामाजिक कार्यकर्ते

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न

ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE

UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY

Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित

प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024